# स्थायी समिती
## दाखल विषय – दि. ३/१०/२०१७

**विषय क्रमांक :– ९७४ त्वर्य**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम क्रमांक ६७ ( ३ ) क अन्वये स्वाईन फ्ल्यु करीता आवश्यक असणारे ओसिल्टामिवीर औषध निविदा क्रमांक २ सन २०१६–१७ मधील मान्य ठेकेदाराकडून मान्य दराने या निविदेतील तीन निविदाधारक १.प्रकाश मेडिको २.वर्धमान मेडिकल सेंटर ३.लक्ष्मी मेडिकल्स यांचेकडून औषधांच्या छापील किंमतीवर ( M.R.P. वर ) १९.१०% इतकी सूट घेऊन आवश्यकतेनुसार रक्कम रूपये५०,००,०००/– ( अक्षरी रक्कम रूपये पन्नास लाख फक्त ) पर्यंत तातडीने औषधे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ ( ३ ) क अन्वये खरेदी करणेकरीता मा.महापालिका आयुक्त यांचे ठराव क्रमांक ६/५४ दिनांक २९/०४/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.त्यानुसार नायडू सांसर्गिक रूग्णालयाकडील मागणीनुसार स्वाईन फ्ल्यूकरीता आवश्यक असलेले ओसिल्टामिवीर टॅब्लेट/कॅपसुल्स व सिरप खरेदी करण्यात आलेली आहे. सदर बाबीची नोंद घेऊन मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/४११ दि.२७/९/२०१७ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ९७५ त्वर्य**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम क्रमांक ६७ ( ३ ) क अन्वये स्वाईन फ्ल्यु करीता आवश्यक असणारे ओसिल्टामिवीर औषध निविदा क्रमांक २ सन २०१६–१७ मधील मान्य ठेकेदाराकडून मान्य दराने या निविदेतील तीन निविदाधारक १.प्रकाश मेडिको २.वर्धमान मेडिकल सेंटर ३.लक्ष्मी मेडिकल्स यांचेकडून औषधांच्या छापील किंमतीवर ( M.R.P. वर ) १९.१०% इतकी सूट घेऊन आवश्यकतेनुसार रक्कम रूपये१०,००,०००/– ( अक्षरी रक्कम रूपये दहा लाख फक्त ) पर्यंत तातडीने औषधे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ ( ३ ) क अन्वये खरेदी करणेकरीता मा.महापालिका आयुक्त यांचे ठराव क्रमांक ६/६६४ दिनांक ३०/०३/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.त्यानुसार नायडू सांसर्गिक रूग्णालयाकडील मागणीनुसार स्वाईन फ्ल्यूकरीता आवश्यक असलेले ओसिल्टामिवीर टॅब्लेट/कॅपसुल्स व सिरप खरेदी करण्यात आलेली आहे. सदर बाबीची नोंद घेऊन मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/४१२ दि.२७/९/२०१७ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ९७६ त्वर्य**

जी.एस.टी करप्रणालीचा समावेश नसल्याने निविदा रद्द करून नव्याने निविदा मागविण्यात येणार असल्याने या प्रकरणी झालेल्या खर्चाबाबत जबाबदारी निश्चित करून संबंधितांकडून सदर संपुर्ण खर्च वसूल करण्यात यावा. या संबंधीची माहिती मा.स्थायी समिती यांचेकडे सादर करणेबाबत मा.योगेश ससाणे यांचे दि. २२/८/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ६७६ दि. २९/८/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी क्र. मआ/परिमंडळ–२(टेंसे)/४१४ दि. २७/९/२०१७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रमांक :– ९७७ त्वर्य**

महापालिका सहाय्यक आयुक्त धनकवडी–सहकारनगर कार्यालयाचे अंतर्गत सार्वजनिक स्वच्छता व झाडण काम करणे (भाग–१) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे/श्री Shivani Enterprises यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९७,५०,१८०/– पेक्षा १४.२०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,११,३४,७०५=५६ पर्यंत काम करणेस तसेच भाववाढ सुत्रानुसार बिल अदा करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.३/४१८ दि.३/१०/२०१७ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ९७८ त्वर्य**

हडपसर क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभागामध्ये टँकरने पाणी पुरवठा करणे (भाग–१) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार रवि फुडस ॲन्ड बेवरेजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४५,००,०००/– पेक्षा ९.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४०,५०,४५०/– पर्यंत काम करुन घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/लपापु/४१९ दि.३/१०/२०१७ चे पत्र.

**विषय क्रमांक :- ९७९ त्वर्य**

नगर रोड (वडगावशेरी) क्षेत्रिय कार्यालयांतर्गत आउट सोर्सिंगने कचरा संदर्भात कामे करुन घेणे (भाग-९) कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.एस.टी.एंटरप्रायजेस यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.२९,४३,९२२=२४ पेक्षा २.५% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.३०,१७,५२०=३० रकमेपर्यंत दि.१९/९/२०१७ पासून काम करुन घेणेस त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/नगर रोड क्षे.का./४२० दि.३/१०/२०१७ चे पत्र.

**विषय क्रमांक :- ९८१ त्वर्य**

कु.अभिमन्यू समीर पुराणिक रा. ६ राहुल कॉम्प्लेक्स्, मधुबन कॉलनी, समर्थ पथ, कर्वेनगर पुणे-५२ हा बुध्दिबळ खेळाडु आमच्या परिचयाचा असून त्याने नुकत्याच आतंराराष्ट्रीय स्तरावर अबुधाबी येथे झालेल्या बुध्दिबळ स्पर्धेत ग्रँड मास्टर हा किताब मिळविला आहे. वयाच्या ५ व्या वर्षांपासुन बुध्दिबळ खेळताना त्याने विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये चॅम्पियनशिप मिळविली आहे. अभिमन्यू हा महाराष्ट्रातील सर्वात तरुण ग्रँड मास्टर आहे. या स्पर्धांमध्ये भाग घेण्याकरिता त्यांस वेळोवेळी देशात व परदेशात जावे लागते. याकरिता पुणे महानगरपालिकेमार्फत त्याला र.रु. ५ लक्ष आर्थिक सहाय्य करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.जयंत भावे, मा.सौ.माधुरी सहस्त्रबुध्दे, मा.दीपक पोटे व मा.सौ.मंजुश्री खर्डेकर यांचे दि.८/९/२०१७ चे पत्रावर झालेला मा.क्रिडा समिती ठराव क्र. २७ दि.१४/९/२०१७ विचारासाठी.

**विषय क्रमांक :- ९८२ त्वर्य**

कु.देवेश राहुल जंगम याची आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या ट्रॅथले क्रीडा प्रकारासाठी भारतातर्फे निवड झालेली असून, ही स्पर्धा स्पेन येथे दि.२० सप्टेंबर २०१७ ते २४ सप्टेंबर २०१७ या दरम्यान होणार आहे. कु.देवेश राहुल जंगम याला पुणे-स्पेन-पुणे ह्या प्रवासासाठी रक्कम रूपये २,५०,०००/- इतका खर्च होणार आहे.तरी पुणे महानगरपालिकेच्या वतीने कु.देवेश राहुल जंगम यास जास्तीत जास्त अर्थसहाय्य मदत करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.राजाभाऊ बराटे यांचे दि.७/९/२०१७ चे पत्रावर झालेला मा.क्रिडा समिती ठराव क्र. २६ दि.१४/९/२०१७ विचारासाठी.

**विषय क्रमांक :- ९८३ त्वर्य**

मा.सौ.मनिषा लडकत व मा.सौ.मंगला मंत्री यांचे दि. २७/९/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.१९ब, मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.८० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७ - १८ चे अंदाजपत्रक, | | |
| १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १०२, अ.क्र. ४, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र. एसबी५),<br>१) पान क्र.२०२, अ.क्र.२६८, प्रभाग क्र.१९ब, मध्ये विशिष्ट प्रकारचे पोल उभारून अत्याधुनिक प्रकाश व्यवस्था करणे, लडकत पेट्रोल पंप ते नेहरू रोड पर्यंत विद्युत विषयक कामे करणे व तद्नुषंगिक कामे करणे. | १० लाख | --- |
| २) पान क्र.२०२, अ.क्र.२६९, प्रभाग क्र.१९ब,मध्ये भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय सुलभ शौचालय नवा रोड ते नेहरू रोड पर्यंत ते जुना मोटार स्टॅण्ड पर्यंत विद्युत विषयक कामे करणे व तद्नुषंगिक कामे करणे | १० लाख | --- |
| ३) पान क्र.२०२, अ.क्र.२७०, प्रभाग क्र.१९ब, मध्ये बाकर कसाब मस्जिद ते भवानी माता मंदिर रोड ते जुना मोटार स्टॅण्ड चौक विशिष्ट प्रकारचे पोल उभारून अत्याधुनिक प्रकाश व्यवस्था करणे, विद्युत विषयक कामे करणे व तद्नुषंगिक कामे करणे. | २० लाख | --- |
| १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. १, शहरातील रस्ते डांबरीकरणाने विकसित करणे, (यादी क्र. एसए २),<br>४) पान क्र.१६०, अ.क्र.२२९, प्रभाग क्र.१९ब, मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे व तद्नुषंगिक कामे करणे. | २० लाख | --- |
| ५) पान क्र.१६०, अ.क्र.२३०, प्रभाग क्र.१९ब, मध्ये मोटार स्टॅण्ड चौक ते गोल्डन जुबली शाळा डांबरीकरण करणे | १० लाख | --- |
| ६) पान क्र.१६०, अ.क्र.२३१, प्रभाग क्र.१९ब, सोनावणे हॉस्पीटल चौक ते मनपा | | |

| | | |
|---|---|---|
| वसाहतीपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे – | | |
| १) प्रभाग क्र.१९ब, मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रीटीकरण करणे. | --- | २० लाख |
| २) प्रभाग क्र.१९ब, नवा रोड क्रांती तरूण मंडळ येथील ड्रेनेज लाईन बदलणे व कॉंक्रीट करणे. | --- | २० लाख |
| ३) प्रभाग क्र.१९ब, मध्ये भवानी माता चौक ते बालाजी पुरम सोसायटी, सापिका पथ ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे. | --- | २० लाख |
| ४) प्रभाग क्र.१९ब, बालाजी पुरम सोसायटी ते हरिभाऊ गॅरेज पर्यंत रस्ता ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे. | --- | २० लाख |

**विषय क्रमांक :– ९८४ त्वर्य**

मा.अमोल बालवडकर यांचे दि. २८/९/२०१७ चे पत्र.

माझे सन २०१७–१८ च्या अंदाजपत्रकातील स–यादीतून प्रभाग क्र. ९ क पाषाण तलाव जलपर्णी काढणे व सुशोभिकरण करणे तरतुद २५ लक्ष (बजेट कोड –सीई२६अे३३६/एसयु१–३३८) सुचविण्यात आले आहे. सदर ठिकाणी अन्य सभासदांमार्फत तसेच महसुली कामांमधून जलपर्णी काढण्याचे काम करण्यात आले आहे. त्यामुळे सदरचे काम करण्याची आवश्यकता नाही.

प्रभाग क्र. ९ बालेवाडी गावठाण येथे अस्तित्वातील ब्लॉकची दुरावस्था झाली असून सदर ठिकाणच्या स्थानिक नागरिकांच्या वारंवार तक्रारी आमचेकडे प्राप्त होत आहेत. तसेच प्रभाग क्र. ९ बाणेर–बालेवाडी परिसरात झपाटयाने विकास होत असल्याने अनेक ठिकाणी अजूनही रस्ते नसल्याबाबत नागरिक तक्रार करीत आहेत. तरी विविध परिसरात डांबरीकरण करण्याची आवश्यकता आहे.

प्रभाग क्र. ९ क मध्ये खालील विविध कामे करणेसाठी र.रु.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. ११०, अ.क्र. ५, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी एसयु १), पान क्र.२५४, अ.क्र.३८, प्रभाग क्र. ९ क पाषाण तलाव जलपर्णी काढणे व सुशोभिकरण करणे | २५ लाख | --- |
| <u>**नवीन सुचविलेली कामे –**</u> | | |
| १) प्रभाग क्र. ९ क बालेवाडी गावठाण येथे ब्लॉक बसविणे | --- | १५ लाख |
| २) प्रभाग क्र. ९ क विविध ठिकाणी डांबरीकरण करणे | --- | १० लाख |

**विषय क्रमांक :– ९८५ त्वर्य**

मा.अमोल बालवडकर यांचे दि. २८/९/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ९ क मध्ये खालील विविध कामे करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, १.पाणीपुरवठा, पान क्र. २४, अ.क्र. १, शहरामध्ये पाण्याच्या नवीन लाईन विकसित करणे, (यादी क्र. एसपी २), पान क्र.३४, अ.क्र.१६५ , प्रभाग क्र. ९ क बालेवाडी गावठाण परिसरात पाण्याची पाईप लाईन टाकणे | २० लाख | --- |
| <u>**नवीन सुचविलेली कामे –**</u> | | |
| १) प्रभाग क्र. ९ क बालेवाडी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र. ९ क बाणेर–बालेवाडी–पाषाण येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे व नविन ड्रेनेज लाईनची कामे करणे | --- | १० लाख |

**विषय क्रमांक :– ९८६ त्वर्य**

मा.अमोल बालवडकर यांचे दि. २८/९/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ९ क मध्ये खालील विविध कामे करणेसाठी र.रु.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १०२, अ.क्र. ४, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र. एसबी५), पान क्र. १९९, अ.क्र. १२६, प्रभाग क्र. ९ क पाषाण पंपिंग येथे विद्युत विषयक कामे करणे, पंप बसविणे | ३० लाख | --- |
| <u>**नवीन सुचविलेली कामे –**</u> | | |
| १) प्रभाग क्र. ९ क बाणेर–बालेवाडी–पाषाण येथे विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र. ९ क बाणेर–बालेवाडी–पाषाण येथील विविध विकास कामांसाठी वॉर्ड–स्तरीय निधी उपलब्ध करणे | --- | २० लाख |

**विषय क्रमांक :– ९८७ त्वर्य**

मा.अमोल बालवडकर यांचे दि. २८/९/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ९ क मध्ये खालील विविध कामे करणेसाठी र.रु.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, १.पाणीपुरवठा, पान क्र. २४, अ.क्र. १, शहरामध्ये पाण्याच्या नवीन लाईन विकसित करणे, (यादी क्र. एसपी २), पान क्र.३४, अ.क्र.१७४, प्रभाग क्र. ९ क बालेवाडी स.नं.३७, ४२,४३,४४,४५ मध्ये जलवितरण व्यवस्था करणे | ३० लाख | --- |
| <u>**नवीन सुचविलेली कामे –**</u> | | |
| १) प्रभाग क्र. ९ क बालेवाडी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १५ लाख |
| २) प्रभाग क्र. ९ क बाणेर–बालेवाडी–पाषाण येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे व नविन ड्रेनेज लाईनची कामे करणे | --- | १५ लाख |

**विषय क्रमांक :– ९८८ त्वर्य**

मा.साईनाथ बाबर यांचे दि. २८/९/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.२७ ड कोंढवा खुर्द गावठान मधील जुन्या ड्रेनेज लाईन बदलने व दुरूस्ती कामे करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
| --- | --- | --- |
| सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, २.मलनि:सारण, पान क्र. २४, अ.क्र. १, शहरामध्ये मलवाहिन्या विकसित करणे, (यादी क्र. एसडी २),<br>१)पान क्र.६२, अ.क्र.५६६, प्रभाग क्र.२७ ड मध्ये समता नगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे<br>२) पान क्र.६२, अ.क्र.५६५, प्रभाग क्र.२७ ड मध्ये नवाजीश पार्क येथे ड्रेनेज लाईन टाकणे.<br><u>**नविन सुचविलेले काम**</u><br>प्रभाग क्र.२७ ड कोंढवा खुर्द गावठान मधील जुन्या ड्रेनेज लाईन बदलने व दुरूस्ती कामे करणे. | <br><br>१० लाख<br>१० लाख<br><br><br>--- | <br><br>---<br>---<br><br><br>२० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :– ९८९ त्वर्य**

मा.विशाल धनवडे यांचे दि. २८/९/२०१७ चे पत्र.

केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमात पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडील कर्मचारी पुणे महानगरपालिकेकडे सन २०१७ पासून करार तत्वावर काम करीत असून त्यांना दर सहा–महिन्यांनी पुर्ननियुक्ती दिली जाते.

पुणे महापालिकेतील सर्व अधिकारी/कर्मचारी (ज्यामध्ये रोजंदारी कर्मचारी देखील समाविष्ट आहेत.) त्यांना दिवाळीनिमीत्त दिले जाणारे सानुग्रह आनुदान व दिवाळी भेट यापासुन सर्व शिक्षा अभियानातील कर्मचारी वंचित आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील सर्व शिक्षा अभियानातील सर्व करार कर्मचारी यांना दिवाळी भेट अनुदान मंजुर करण्यात आलेले असून त्याच धर्तीवर सर्व शिक्षा अभियान अंतर्गत म्हणजेच (४० कर्मचाऱ्यांना) सानुग्रह अनुदान व दिवळी भेट देण्यात यावी .

याकरीता तरतुद करावी.

**विषय क्रमांक :- ९९० त्वर्य**

मा.श्रीकांत जगताप यांचे दि. २९/९/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ३४ ड मध्ये खालील विविध विकासकामे करणेसाठी र.रु.६० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, २.मलनि:सारण, पान क्र. २४, अ.क्र. १, शहरामध्ये मलवाहिन्या विकसित करणे, (यादी क्र. एसडी २), १)पान क्र. ६५, अ.क्र. ७३८, प्रभाग क्र. ३४ ड महादेवनगर परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे | १० लाख | --- |
| २)पान क्र. ६६, अ.क्र. ७३९, प्रभाग क्र. ३४ ड साईनगर परिसरात मोठया व्यासाच्या ड्रेनेज लाईन टाकणे | १० लाख | --- |
| ३)पान क्र. ६६, अ.क्र. ७४०, प्रभाग क्र. ३४ ड आनंदविहार परिसरामध्ये ड्रेनेज लाईन टाकणे | १० लाख | --- |
| ४)पान क्र. ६६, अ.क्र. ७४१, प्रभाग क्र. ३४ ड मध्ये विश्रांतीनगर परिसरामध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज विषयक कामे करणे | १० लाख | --- |
| ५)पान क्र. ६६, अ.क्र. ७४२, प्रभाग क्र. ३४ ड आनंदनगर परिसरात मोठया व्यासाच्या ड्रेनेज लाईन टाकणे | १० लाख | --- |
| ६)पान क्र. ६६, अ.क्र. ७४३, प्रभाग क्र. ३४ ड एकतानगरी, भाऊसाहेब चरवडनगर परिसरामध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज विषयक कामे करणे | १० लाख | --- |
| **नवीन सुचविलेली कामे -** | | |
| १) प्रभाग क्र.३४ ड मध्ये गणेश कॉलनी समर्थनगर परिसरात विविध ठिकाणी ड्रेनेज व पावसाळी लाईन विषयक कामे करणे. | --- | २० लाख |
| २) प्रभाग क्र.३४ ड मध्ये एकता नगरी भाऊसाहेब चरवडनगर परिसरामध्ये पावसाळी गटार व विविध विकासाची कामे करणे. | --- | २० लाख |
| ३) प्रभाग क्र.३४ ड मध्ये आनंदविहार, सनसिटी परिसरामध्ये स्ट्रॉंग वॉटर लाईन, विविध विकासाची कामे करणे. | --- | २० लाख |

**विषय क्रमांक :- ९९१ त्वर्य**

मा.सौ.आरती कोंढरे यांचे दि. ३/१०/२०१७ चे पत्र.

कमला नेहरु दवाखाना मंगळवार पेठ यांच्या धर्तीवर कोटणीस दवाखाना शुक्रवार पेठ यांचे पुर्नबांधणी व आधुनिक सोयी सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, २. प्राथमिक शिक्षण, पान क्र. ९६, अ.क्र. १४, प्राथमिक शाळेसाठी नविन इमारत बांधणे, (यादी क्र. क्र.एसजे २), पान क्र.२२१, अ.क्र.६९, प्रभाग क्र. १८ ब आनंदीबाई कर्वे शाळा (गवरी आळी) विविध विकास कामे करणे. | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम**<br>कमला नेहरु दवाखाना मंगळवार पेठ यांच्या धर्तीवर कोटणीस दवाखाना शुक्रवार पेठ यांचे पुर्नबांधणी व आधुनिक सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे | --- | १० लाख |

**विषय क्रमांक :- ९९२ त्वर्य**

मा.प्रमोद (नाना) भानगिरे यांचे दि. ३/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. २६ ब मधील हडपसर सर्व्हे नं. ७३/३३२/३४१ या ॲमिनिटी स्पेसच्या जागेवर जलतरण तलाव बांधणेसाठी र.रू. ४० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. ११०, अ.क्र. ५, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी एसयु १), १)पान क्र. २५५, अ.क्र. १०३, प्रभाग क्र. २६ ब मध्ये न्याती चौक सुशोभिकरण गार्डन करणे<br>१)पान क्र. २५५, अ.क्र. १००, प्रभाग क्र. २६ ब मध्ये सर्व्हे नं. २३/२४/२५ नाल्याचे सुशोभिकरण करणे | ३० लाख<br>१० लाख | ---<br>--- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. २६ ब मधील हडपसर सर्व्हे नं. ७३/३३२/३४१ या ॲमिनिटी स्पेसच्या जागेवर जलतरण तलाव बांधणे | --- | ४० लाख |

**विषय क्रमांक :- ९९३ त्वर्य**

मा.हरिदास चरवड यांचे दि. ३/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ३३ अ वडगांव बुद्रुक - धायरी येथील विविध रस्त्यांवर फुटपाथ रेलिंग व इतर विकासाची कामे करणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. ५, शहरात विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र. एसए १०), पान क्र.१७४, अ.क्र. ४६, प्रभाग क्र. ३३ अ वडगांव बुद्रुक येथील सर्व राडारोडा उचलणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. ३३ अ वडगांव बुद्रुक - धायरी येथील विविध रस्त्यांवर फुटपाथ रेलिंग व इतर विकासाची कामे करणे | --- | १० लाख |

**विषय क्रमांक :- ९९४ त्वर्य**

मा.हरिदास चरवड यांचे दि. ३/१०/२०१७ चे पत्र.

सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. ११०, अ.क्र.८, शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. एसजे २४), पान क्र.२४६, अ.क्र. १३५, प्रभाग क्र. ३३ अ वडगांव बुद्रुक येथील सर्व्हे नं.५७/२, ५७/अ/२, ५७/१अ/३ हायवे येथील आरक्षित जागेत बहुउद्देशीय इमारत, विविध खेळाचे इनडोअर हॉल, क्रिडा दालन क्रिडा सल्लागार केंद्र क्रिडा विषयक हॉल उभारणे याकामासाठी आणि व तदनुषंगिक इतर विविध विकासाची कामे करणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १०.घ.पूल व नदी सुधारणा (विकास योजना), पान क्र.१०६, अ.क्र.३, शहरात विविध ठिकाणी पूल बांधणे, उड्डाणपूल बांधणे, भुयारी मार्ग करणे, (यादी क्र. एसएल १), पान क्र.२१३, अ.क्र.२२, प्रभाग क्र. ३३ अ त्रिमुर्ती हॉस्पिटल चौक, अभिरुची मॉल समोर, नितीन पेंट येथे शरद हॉस्पिटलसमोर वडगाव फाटा याठिकाणी पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी ओव्हर हेडेड ब्रिज (लोखंडी पादचारी पूल) बांधणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. ११०, अ.क्र.८, शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. एसजे २४), पान क्र.२४६, अ.क्र. १३५, प्रभाग क्र. ३३ अ वडगांव बुद्रुक येथील सर्व्हे नं.५७/२, ५७/अ/२, ५७/१अ/३ हायवे येथील आरक्षित जागेत बहुउद्देशीय इमारत, विविध खेळाचे इनडोअर हॉल, क्रिडा दालन क्रिडा सल्लागार केंद्र क्रिडा विषयक हॉल उभारणे याकामासाठी आणि व तदनुषंगिक इतर विविध विकासाची कामे करणे | --- | १० लाख |

**विषय क्रमांक :- ९९५ त्वर्य**

मा.सौ.राजश्री नवले व मा.हरिदास चरवड यांचे दि. ३/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ३३ ब मधील स.नं.६६ मधील सुरेश पोकळे बिल्डींग (नऱ्हे रोड) ते भारती बँक पर्यंत पावसाळी लाईन टाकणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १०.च. स्ट्राँग वॉटर ड्रेन प्रकल्प, पान क्र. १०६, अ.क्र. १, पुणे शहरातील पावसाळी पाण्याच्या व्यवस्थापनासाठी नाला सुधारणा कामे, कल्व्हर्टस व पावसाळी लाईन टाकणे, (यादी क्र.एसएफ १), पान क्र. २१७, अ.क्र. ९५, प्रभाग क्र. ३३ ब वडगांव बु. परिसरातील पावसाळी साफसफाई व दुरुस्ती करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. ३३ ब मधील स.नं.६६ मधील सुरेश पोकळे बिल्डींग (नऱ्हे रोड) ते भारती बँक पर्यंत पावसाळी लाईन टाकणे | --- | १० लाख |

**विषय क्रमांक :- ९९६ त्वर्य**

मा.सौ.राजश्री नवले व मा.हरिदास चरवड यांचे दि. ३/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ३३ ब मधील स.नं.६५ मधील नऱ्हे रोड सुरुवात ते स्विट मॉल पर्यंत पावसाळी लाईन टाकणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १०.च. स्ट्राँग वॉटर ड्रेन प्रकल्प, पान क्र. १०६, अ.क्र. १, पुणे शहरातील पावसाळी पाण्याच्या व्यवस्थापनासाठी नाला सुधारणा कामे, कल्व्हर्टस व पावसाळी लाईन टाकणे, (यादी क्र.एसएफ १), पान क्र. २१८, अ.क्र. ९६, प्रभाग क्र. ३३ ब अभिरुची मॉल (भिडेवाडी) पावसाळी लाईन टाकणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. ३३ ब मधील स.नं.६५ मधील नऱ्हे रोड सुरुवात ते स्विट मॉल पर्यंत पावसाळी लाईन टाकणे | --- | १० लाख |

**विषय क्रमांक :- ९९७ त्वर्य**

मा.सौ.राजश्री नवले व मा.हरिदास चरवड यांचे दि. ३/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ३३ ब मध्ये १५१/१ शाळेसाठी आरक्षित असणाऱ्या जागेवर ई-लर्निंग स्कूलसाठी ४३२५ चौ.मी. जागा साठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०)<br>१) पान क्र.२३८, अ.क्र.४५८, प्रभाग क्र. ३३ ब गोसावी वस्ती (जिजामाता बँकेच्या मागे) कॅनॉलवर कंपाऊंड वॉल बांधणे | १० लाख | --- |
| २) पान क्र.२३८, अ.क्र.४६०, प्रभाग क्र. ३३ ब वडगाव खुर्द परिसरातील गणपती विसर्जन घाट तयार करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. ३३ ब मध्ये १५१/1 शाळेसाठी आरक्षित असणाऱ्या जागेवर ई-लर्निंग स्कूलसाठी ४३२५ चौ.मी. जागा | --- | २० लाख |

**विषय क्रमांक :- ९९८ त्वर्य**

मा.सौ.राजश्री नवले व मा.हरिदास चरवड यांचे दि. ३/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ३३ ब कचरा उचलणे व साफसफाई कर्मचाऱ्यांसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. १, शहरातील रस्ते डांबरीकरणाने विकसित करणे, (यादी क्र. एसए २), पान क्र. १६३, अ.क्र. ४१४, प्रभाग क्र. ३३ ब व्यंकटेश सृष्टी शेजारील रस्ता डांबरीकरण करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. ३३ ब कचरा उचलणे व साफसफाई कर्मचाऱ्यांसाठी | --- | १० लाख |

**विषय क्रमांक :- ९९९ त्वर्य**

मा.सौ.राजश्री नवले व मा.हरिदास चरवड यांचे दि. ३/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ३३ ब स.नं.५७ उद्यानाच्या आरक्षित जागेवर उद्यान विकसित करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १०.घ.पूल व नदी सुधारणा (विकास योजना), पान क्र.१०६, अ.क्र.३, शहरात विविध ठिकाणी पूल बांधणे, उड्डाणपूल बांधणे, भुयारी मार्ग करणे, (यादी क्र. एसएल १), पान क्र.२१३, अ.क्र.२६, प्रभाग क्र. ३३ ब सिंहगड रस्ता (अभिरुची मॉल समोर) पादचारी पूल उभारणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. ३३ ब स.नं.५७ उद्यानाच्या आरक्षित जागेवर उद्यान विकसित करणे | --- | २० लाख |

**विषय क्रमांक :- १००० त्वर्य**

मा.सौ.माधुरी सहस्त्रबुध्दे यांचे दि. ३/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. १३ ब मध्ये बायोगॅस प्लँट (Energy Bin) बसविणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, ९.पथांची झाडलोट/घनकचरा व्यवस्थापन विभाग, पान क्र. १००, अ.क्र. १९, घनकचरा संदर्भात शहरात विविध विकास कामे करणे, (यादी एसएच १), पान क्र. २५१, अ.क्र. १५, प्रभाग क्र. १३ ब प्रभागातील सॅनिटरी नॅपकीनच्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी इन्सिनरेटर बसविणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. १३ ब मध्ये बायोगॅस प्लँट (Energy Bin) बसविणे | --- | १० लाख |

**विषय क्रमांक :- १००१ त्वर्य**

मा.कु.सायली रमेशभाऊ वांजळे यांचे दि. ३/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ३२ ब मध्ये खालील विविध विकासकामे करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. ११०, अ.क्र.८, शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. एसजे २४), पान क्र.२४६, अ.क्र.१३१, प्रभाग क्र.३२ ब मध्ये ॲमिनिटी स्पेस मध्ये क्रिडांगण विकसित करणे. | २० लाख | --- |
| **<u>नवीन सुचविलेली कामे -</u>** | | |
| १) प्रभाग क्र.३२ब वारजे माळवाडी विविध विकास कामे करणे. | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.३२ब आहिरेगाव विठ्ठलमंदिरा जवळ जॉगिंग ट्रॅक विकसीत करणे. | --- | १० लाख |

**विषय क्रमांक :– १००२ त्वर्य**

मा.मारुती तुपे व मा.अनिल टिंगरे यांचे दि. ३/१०/२०१७ चे पत्र.

मा. स्थायी समिती ठ.क्र. ९५१ दि. २६/९/२०१७ चा फेरविचार करण्यात येवून खालीलप्रमाणे प्रस्ताव मान्य करावा.

प्रभाग क्र. २३ ड मध्ये काळे बोराटेनगर येथील सर्व्हे नं. ३५/४/२ पी (२१०५ चौ.मी. क्षेत्र) व सर्व्हे नं. ३५/४/९/९ (२१०५ चौ.मी. क्षेत्र) येथे ई–लर्निंग स्कुल सुरु करणेसाठी र.रू.१ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२३५, अ.क्र.३३२, प्रभाग क्र. २३ ड मध्ये अभ्यासिका विकसित करणे. | १० लाख | --- |
| २ | २. प्राथमिक शिक्षण, पान क्र. ९६, अ.क्र. १४, प्राथमिक शाळेसाठी नविन इमारत बांधणे, (यादी क्र. क्र.एसजे २), पान क्र.२२२, अ.क्र.९५, प्रभाग क्र. २३ ड मध्ये काळे बोराटे नगर, मारुतराव काळे प्राथमिक शाळा क्र. १२ बी येथे सभागृह बांधणे. | ४० लाख | --- |
| ३ | २. प्राथमिक शिक्षण, पान क्र. ९६, अ.क्र. १४, प्राथमिक शाळेसाठी नविन इमारत बांधणे, (यादी क्र. क्र.एसजे २), पान क्र.२२२, अ.क्र.९८, प्रभाग क्र. २३ ड मध्ये ई लर्निंग स्कूल सुरु करणे | ५० लाख | --- |
| | **नवीन सुचविलेले कामे** | | |
| १ | प्रभाग क्र. २३ ड मध्ये काळे बोराटेनगर येथील सर्व्हे नं. ३५/४/२ पी (२१०५ चौ.मी. क्षेत्र) व सर्व्हे नं. ३५/४/९/९ (२१०५ चौ.मी. क्षेत्र) येथे ई–लर्निंग स्कुल सुरु करणे | --- | १ कोटी |

याबाबत यापुर्वी झालेला स्थायी समिती ठ.क्र. ९५१ दि. २६/९/२०१७ चा निरुस्त करण्यात येत आहे.

**विषय क्रमांक :– १००३ त्वर्य**

मा.योगेश समेळ यांचे दि. ३/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. १६ ड मध्ये खालील विविध विकासकामे करणेसाठी र.रु.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०२, अ.क्र. १६, शहरातील रस्ते कॉंक्रीटने विकसित करणे, (यादी क्र. एसए १५), पान क्र.१८०, अ.क्र.२४३, प्रभाग क्र. १६ ड मध्ये अपोलो टॉकीज ते उंबऱ्या मारुती (के.ई.एम.) रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ५० लाख | --- |
| **<u>नवीन सुचविलेली कामे –</u>** | | |
| १) प्रभाग क्र.१६ ड – सोमवार पेठ जैन मंदिर ते शनी मंदिर मुख्य रस्ता खोदाई करुन सिमेंट कॉंक्रीट करणे व तदनुषंगिक कामे करणे. | --- | १५ लाख |
| २) प्रभाग क्र.१६ ड – २७ सोमवार पेठ ते अमर सेंटर मुख्य रस्ता खोदाई करुन सिमेंट कॉंक्रीट करणे व तदनुषंगिक कामे करणे. | --- | १५ लाख |
| ३) प्रभाग क्र.१६ ड – ३४४ सोमवार पेठ ते १५ ऑगस्ट चौक मुख्य रस्ता खोदाई करुन सिमेंट कॉंक्रीट करणे व तदनुषंगिक कामे करणे. | --- | २० लाख |

**विषय क्रमांक :– १००४ त्वर्य**

मा.मारुती सांगडे व मा.अनिल टिंगरे यांचे दि. ३/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. १ ब (कळस–धानोरी) मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. १, शहरातील रस्ते डांबरीकरणाने विकसित करणे, (यादी क्र. एसए २), पान क्र.१५५, अ.क्र.२, प्रभाग क्र. १ ब (कळस-धानोरी) मधील मयुर किलबिल सोसायटी ते स.नं. २३, २४ ला जोडला जाणारा डी.पी.रोड विकसित करणे | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १)प्रभाग क्र. १ ब (कळस-धानोरी) मधील कळस परिसरात विविध रस्ते सिमेंट काँक्रीट करणे | --- | १० लाख |
| २)प्रभाग क्र. १ ब (कळस-धानोरी) मधील कळस-विश्रांतवाडी परिसरात विविध रस्ते सिमेंट काँक्रीट करणे | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र. १ ब (कळस-धानोरी) मधील धानोरी परिसरात विविध रस्ते सिमेंट काँक्रीट करणे | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र. १ ब (कळस-धानोरी) मधील मुंजाबावस्ती परिसरात विविध रस्ते सिमेंट काँक्रीट करणे | --- | १० लाख |
| ५)प्रभाग क्र. १ ब (कळस-धानोरी) मधील विविध रस्ते सिमेंट काँक्रीट करणे | --- | १० लाख |

**विषय क्रमांक :- १००५ त्वर्य**

मा.अविनाश बागवे, मा.प्रमोद भानगिरे, मा.योगेश समेळ व मारुती तुपे यांचे दि. ३/१०/२०१७ चे पत्र.

मा.स्थायी समितीच्या ठरावातील सूचविलेल्या बँकामधील ज्या बँकेचा व्याजदर जास्तीत जास्त असेल त्याच बँकेत गुंतवणूक करण्यात यावी. जी बँक सदर व्याजदर देण्यास असमर्थता दर्शविल त्या बँकेत गुंतवणूक न करता ठरावातील जी बँक प्राप्त व्याजदराप्रमाणे रक्कम स्विकारण्यास समर्थ असेल त्याच बँकेत उर्वरित रकमेची गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :- १००६ त्वर्य**

मा.मारुती तुपे व मा.प्रमोद भानगिरे यांचे दि. ३/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. २३ ड (हडपसर गाव-सातववाडी) मध्ये काळेपडळ व रामटेकडी येथील गेट क्र. ६ व ७ तसेच गेट क्र. ७ व ८ या दरम्यान हलक्या वाहनांकरीता भुयारी मार्गाच्या बांधकामाकरीता आर्थिक तरतुद उपलब्ध करुन देणेसाठी खालीलप्रमाणे मान्यता द्यावी.

ससाणेनगर काळेपडळ या भागात सातत्याने वाहतूक कोंडी होत असल्याने, नागरिकांची गैरसोय टाळणेकरीता रेल्वे प्रशासनाकडील अनुक्रमे काळेपडळ व रामटेकडी येथील गेट क्र. ६ व ७ तसेच गेट क्र. ७ व ८ या दरम्यान हलक्या वाहनांकरीता भुयारी मार्गाच्या बांधकामाकरीता मागणी होत आहे. रेल्वे प्रशासनामार्फत दोन्ही प्रस्तावित भुयारी मार्गाचे Block Estimate ची रक्कम रुपये ६,८३,१७,७३०/- (सुमारे) कळविणेत आलेली आहे.

यापुर्वी पुणे महानगरपालिकेमार्फत र.रुपये १,११,५५,३७७=०० इतकी धनादेश क्र.६९९०५६ दि.१८/२/२०१७ (आयसीआयसीआय बँक बंडगार्डन रोड, पुणे - १) अन्वये सिनिअर डिव्हीजन फायनान्स मॅनेजर, पुणे सेंट्रल रेल्वे यांना अदा करणेत आलेली आहे. सदर रकमेतून काळेपडळ व रामटेकडी येथील गेट क्र. ६ व ७ तसेच गेट क्र. ७ व ८ या दरम्यानच्या लांबीमध्ये हलक्या वाहनांकरीता भुयारी मार्गाच्या बांधकामाकरीता सर्वेक्षण व व्यवहार्यता तपासणे करीता (पी अँड ई चार्जेस) रुपये ९,१६,२७२/- इतकी रक्कम मध्य रेल्वे प्रशासन कार्यालय, पुणे यांना सार्वजनिक वाहतुक सुधारणा व विशेष प्रकल्प विभागामार्फत करावयाची कामे अ.क्र.१० बजेट कोड नं. एफई६१अे१११, हांडेवाडी-ससाणेनगर येथे रेल्वे उड्डाणपूल बांधणे या अर्थशिर्षकामधून देणेस.

सुनिल पारखी
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.